**इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (आयएफए)**

त्यांच्या आर्ट्स रिसर्च प्रोग्रॅमसाठी

**अर्ज मागवत आहे**

**अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख: Wednesday, August 16, 2023, 11:59 PM (IST)**

आर्ट्स रिसर्च प्रोग्रॅम, विद्वान, संशोधक आणि अभ्यासकांना, भारतातील कलानिर्मितीच्या विविध पद्धती आणि त्यांचा इतिहास यांवर संशोधन करण्यासाठी पाचारण करतो. हा कार्यक्रम, कलाप्रांताचा दृष्टीकोन, त्याची समज, त्याच्या व्याख्या आणि त्यातील सहभाग व्यापक करण्याचा प्रयत्न करत असतो.

आम्ही, आमच्या, आर्ट्स रिसर्च प्रोग्रॅमअंतर्गत चालवले जाणारे संशोधन प्रकल्प हाती घेण्यास इच्छुक असलेल्या संशोधक आणि अभ्यासकांकडून प्रस्ताव मागवत आहोत. हे प्रकल्प उपेक्षित किंवा नवीन कलाक्षेत्रांचा शोध घेऊ शकतात; कलानिर्मितीचे सिद्धांत आणि प्रत्यक्ष कलानिर्मितीच्या पद्धती यांत सांगड घालण्याचा प्रयत्न करू शकतात; कलानिर्मितीच्या पद्धतींचे नवे आयाम अभ्यासू शकतात; आणि वेगवेगळे कलाप्रांत एकत्र करून नवीन संकल्पनेला वाट करून देऊ शकतात.

संशोधन प्रकल्पाला निश्चित उद्दिष्टे असणे आवश्यक आहे, पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण करणे, महत्त्वाच्या प्रश्नांचे संशोधन करणे, सबळ संदर्भ असलेल्या संशोधन पद्धती वापरणे आणि प्रकाशित करण्यायोग्य ठाम निष्कर्ष असणेही आवश्यक आहे. संशोधनाचे निष्कर्ष पुस्तक, निबंध, चित्रपट, वेबसाईट किंवा बहुमाध्यमी प्रदर्शन या स्वरूपात असू शकतात.

अर्ज मागवणे प्रक्रियेबद्दल भारतीय भाषांमधे जाणून घेण्यासाठी येथे क्लिक करा.

प्रकल्पाचा कालखंड:

कमीतकमी **एक वर्ष** ते जास्तीतजास्त **अठरा महिने**.

अर्थसहाय्य (Budget):

जास्तीतजास्त **Rs 5,00,000/-**

अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख:

**बुधवार, August 16, 2023, 11:59 PM (IST)**

## प्रस्ताव कोण पाठवू शकेल?

हा कार्यक्रम वेगवेगळ्या कला प्रांतातील स्वतंत्र अभ्यासक, संशोधक आणि कलाकार यांच्या प्रस्तावांसाठी खुला आहे.

प्रस्ताव पाठवायची पात्रता भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. (अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा.)

## प्रस्ताव पाठवायची पद्धत:

तुमच्या प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असावा:

- **तुमच्या प्रस्तावित** संशोधन प्रकल्पाला निश्चित उद्दिष्टे असणे आवश्यक आहे, पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण करणे, महत्त्वाच्या प्रश्नांचे संशोधन करणे, सबळ संदर्भ असलेल्या संशोधन पद्धती वापरणे आणि प्रकाशित करण्यायोग्य ठाम निष्कर्ष असणेही आवश्यक आहे;
- आम्हाला तुमच्या कामाचा अंदाज येण्यासाठी जर काही एक **सहाय्यभूत साहित्य** असेल तर त्याचाही समावेश प्रस्तावात हवा;
- तुमचा बायोडाटा;
- अनुदानाचा वापर कसा केला जाईल हे स्पष्ट करणारे **बजेटचे तपशीलवार विश्लेषण**. कृपया इतर स्त्रोतांकडून जर काही निधी अपेक्षित असेल तर त्याचाही उल्लेख करा;
- तुमचा पत्ता, फोन नंबर आणि ईमेल आयडी.

## **इतर माहिती:**

- बजेटमध्ये केवळ प्रकल्पाशी संबंधित कर्मचाऱ्यांचा खर्च, निगडित कामकाज आणि प्रवास समाविष्ट असेल आणि आवश्यक असल्यास उपकरणे माफक दराने भाड्याने घेणे आणि थोड्याफार साहित्याची तरतूद केली जाऊ शकते. कृपया प्रत्येक बजेट श्रेणी प्रकल्पाशी संबंधित खर्चाच्या विशिष्ट बाबीशी संबंधित असल्याची खात्री करा;
- तुम्ही प्रस्तावित बजेटच्या, जास्तीतजास्त 35% इतक्या रक्कमेची विनंती, तुमच्या मानधनासाठी करू शकता;

- कृपया संस्थेचे इतर खर्च, कोणत्याही स्वरूपाचा कायम बांधणी खर्च किंवा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी बजेटमधे तरतूद करू नका. बजेटचा वापर उपकरणे खरेदी करण्यासाठी केला जाऊ शकत नाही, परंतु जर तुम्हाला प्रकल्पासाठी विशिष्ट उपकरणे खरेदी करायची असल्यास, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ती उपकरणे आयएफएकडे परत देणे बंधनकारक राहील. उपकरणे खरेदी करण्यासाठी आयएफएची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

**निवड प्रक्रिया:**

निवडक प्रस्ताव एका बाह्य समितीद्वारे तपासली जातील आणि अर्जदारांना या समितीसमोर त्यांच्या प्रकल्पाच्या संकल्पना सादर कराव्या लागतील. निवड झालेल्या प्रकल्पांची यादी **December 2023** मधे जाहीर करण्यात येईल. प्रकल्प निवडीबाबत आयएफएचा निर्णय अंतिम असेल.

प्रस्ताव पाठवायची पद्धत:

- **तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए, विविध भाषांमधील लहेजा कायम राखण्यासाठी, इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते.**
- तुमचा प्रस्ताव पाठवण्यापूर्वी तुम्हाला प्रकल्प संकल्पनांवर चर्चा करायची असल्यास किंवा त्यासंबंधी काही शंका असल्यास, कृपया येथे लिहा: Harshita Bathwal, Programme Officer, Arts Research, at harshita@indiaifa.org अशा ईमेलची सब्जेक्ट लाईन असेल: **Project Proposal for Arts Research.** आणि असा ईमेल तुम्हाला सोमवार, **July 31, 2023**, पूर्वी पाठवावा लागेल.
- तुम्ही तुमचा अंतिम अर्ज, त्याच्या सहाय्यभूत साहित्यासह, 25 एमबी पर्यंतच्या, एकाच इमेलद्वारे, harshita@indiaifa.org इथे **Wednesday, August 16, 2023, 11:59 PM (IST)** अथवा त्यापूर्वी पाठवू शकता.

कृपया लक्षात घ्या की अपूर्ण प्रस्ताव आणि पात्रता निकषांमध्ये न बसणाऱ्या अर्जदारांचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

**निवडलेले सर्व प्रकल्प आयएफए चालवेल.**

*कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.*

*आर्ट्स रिसर्च कार्यक्रम, BNP Paribas India यांच्या, सौजन्याने शक्य झाला आहे.*